# नरेंद्र मेहतांची मीरा भाईंदरमध्ये दमदार एन्ट्री

भाईंदर

राजकारणात पुन्हा सक्रीय होण्यासाठी आधी पक्ष ताब्यात घेऊन वरिष्ठांची मर्जी संपादन करत भाजपचे नरेंद्र मेहता यांनी विधानसभा निवडणुकीत भरघोस मते मिळवत मीरा भाईंदरच्या राजकारणात दमदार एन्ट्री केली आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत नरेंद्र मेहतांचा पराभव करून अपक्ष म्हणून निवडून आलेल्या गीता जैन यांनी आधी महाविकास आघाडी नंतर शिंदे गटाशी जवळीक साधत केलेले राजकारण त्यांच्याच अंगलट आले. भाजपने नरेंद्र मेहतांना उमेदवारी दिल्यावर अपक्ष म्हणून रिंगणात उतरलेल्या गीता जैन यांचा दारुण पराभव झाला असून त्या तिसऱ्या क्रमांकावर फेकल्या गेल्या.



२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत तत्कालीन भाजपचे आमदार नरेंद्र मेहता यांच्या राजकारणाला कंटाळलेल्या भाईंदरमधील विविध पक्षातील नेते आणि व्यावसायिकांनी भाजपच्या नगरसेविका आणि माजी महापौर असलेल्या अपक्ष उमेदवार गीता जैन यांना मदत केल्याने मेहतांचा पराभव झाला होता. त्यावेळी भाजप-शिवसेना युतीची सत्ता येऊ शकली नाही. महाविकास आघाडी सत्तेवर आल्यावर आमदार गीता जैन यांनी मातोश्रीवर जाऊन थेट शिवबंधन बांधले होते. त्यानंतर आपण शिवसेनेत प्रवेश केला नाही, अशी सारवासारव आमदार जैन यांनी केली होती. खरे तर तेव्हाच गीता जैन यांना भाजपने दूर सारले होते.

महाविकास आघाडीत फूट पाडून एकनाथ शिंदे गुवाहिटाला गेले तेव्हा आमदार गीता जैनदेखिल त्यात सामिल झाल्या होत्या. त्यानंतर राज्यात महायुतीचे सरकार आल्यावर जैन कधी शिंदे गट तर कधी भाजप अशी कसरत करत असलेल्या आमदार गीता जैन राजकीय भूमिका घेण्यात अपयशी ठरत असल्याचे दिसले. दुसरीकडे, नरेंद्र मेहता पुन्हा राजकारणात सक्रीय झाले. त्यांना सर्वप्रथम मीरा भाईंदरमधील भाजप ताब्यात घेतली. त्यासाठी अर्थातच त्यांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्यासह भाजपमधील दिग्गजांची साथ मिळत गेली.

मेहता भाजपमध्ये सक्रीय झाल्याबरोबरच शिंदे गटाचे ओवळा-माजिवडा विधानसभा मतदारसंघातील आमदार प्रताप सरनाईक यांनीही मेहतांविरोधात राजकारण सुरु केले. मीरा भाईंदर महापालिकेवर वर्चस्व ठेवण्यावरून मेहता आणि सरनाईक यांच्यातील राजकारणात अधूनमधून वाद होत होते. त्यावेळी गीता मेहता या आमदार प्रताप सरनाईक यांच्यासोबत राहिल्या. पण, विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपात नरेंद्र मेहता यांनी दोघांवर कडी करत भाजपची उमेदवारी मिळवली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गीता जैन यांच्यासाठी मीरा भाईंदर विधानसभा मतदारसंघाची जागा मिळावी, यासाठी फारसा आग्रह केल्याचेही दिसले नाही.

# वाड्याच्या तीनही मतदारसंघात महायुतीची सरशी

वाडा

वाडा तालुक्याला तीन मतदारसंघ लाभले असून या तीनही मतदारसंघात महायुतीचे उमेदवार विजयी झाल्याने महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. यावेळी फटाके फोडत लाडू भरवून गुलाल उधळत घोषणाबाजी करीत कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.

शहापूर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे दौलत दरोडा हे निवडून आले आहेत. दरोडा यांना 73 हजार 081 तर त्यांचे प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार पांडुरंग बरोरा यांना 71 हजार 409 मते मिळाली असून अवघ्या 1672 मतांनी दरोडा हे निवडून आले आहेत. भिवंडी ग्रामीण मतदारसंघातून शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे विद्यमान आमदार शांताराम मोरे यांनी हॅटट्रीक केली असून ते सलग तिस-यांदा विजयी झाले आहेत. त्यांनी आपले प्रतिस्पर्धी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार महादेव घाटाळ यांचा दारूण पराभव केला आहे.

तर विक्रमगड मतदार संघात भाजपचे हरिश्चंद्र भोये हे निवडून आले असून त्यांनी आपले प्रतिस्पर्धी उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार सुनील भुसारा यांचा पराभव केला आहे. तिनही मतदार संघात महायुतीचे उमेदवार विजयी झाल्याने कार्यकर्त्यांनी वाडा कुडूस या महत्वाच्या बाजारपेठेसह गावा गावात आपला जल्लोष साजरा केला.

# विक्रमगड पुन्हा भाजपच्या ताब्यात

जव्हार

मतदारसंघ पुर्नरचनेनंतर सलग दोनवेळा विक्रमगड विधानसभा जिंकणाऱ्या भाजपच्या २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पराभव झाला होता. यावेळी त्यापराभवाची परतफेड करत भाजपने विक्रमगड विधानसभा मतदारसंघ पुन्हा काबिज केला आहे. भाजपचे हरिश्चंद्र भोये यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे विद्यमान आमदार सुनिल भुसारा यांचा पराभव केला. यानिवडणुकीत आमदार भुसारा यांचा तब्बल ४१ हजार ५९६ मतांच्या फरकाने विजय झाला.

विधानसभा मतदारसंघाच्या २००९ ला झालेल्या पुर्नरचनेनंतर भाजपने २००९ व २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत सलग दोनदा विजय मिळवला होता. त्यानंतर २०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार सुनिल भुसारांनी भाजपचा हा गड भेदला होता. त्यांनी भाजपच्या डॉ. हेमंत सवरांचा २१ हजार ३९९ मतांनी पराभव केला होता. त्यानंतर लोकसभा निवडणुकीत डॉ. हेमंत सवरांनी विक्रमगड विधानसभा क्षेत्रातून सुमारे ३३ हजारांचे मताधिक्य घेऊन, पालघर लोकसभा निवडणुकीत सुमारे १ लाख ८३ हजार मतांची आघाडी घेऊन विजयश्री मिळवला होता.

विधानसभा निवडणुकीत विक्रमगड विधानसभेत, भाजपने लोकसभा निवडणुकीच्या मताधिक्यात वाढ करून सुमारे ४१ हजार ५९६ मतांची आघाडी घेत हरिश्चंद्र भोये विजयी झाले आहेत. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सुनिल भुसारांचा पराभव केला. खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी या मतदारसंघाची बांधणी केली आहे. त्यामुळे भाजपने आपला पारंपारिक वर्चस्व असलेला विक्रम'गड' पुन्हा सर केला आहे. या विजयाने संपुर्ण विक्रमगड विधानसभा क्षेत्रात भाजप कार्यकर्त्यांनी, गुलाल ऊधळुन, फटाके फोडून तसेच पेढे वाटून विजयी जल्लोष साजरा केला.

# रिझवी कॉलेज ऑफ एज्युकेशनतर्फे 'रन फॉर सेफ्टी' आणि 'रन फॉर सस्टेनेबिलिटी'चे आयोजन

मुंबई

23 ऑक्टोबर 2024 रिझवी कॉलेज ऑफ एज्युकेशन, हेल्प युवरसेल्फ फाऊंडेशन आणि रिझवी एज्युकेशन सोसायटीच्या अवामी ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सच्या मार्गदर्शन आणि समुपदेशन सेलने जागतिक मानसिक आरोग्य जागरूकता दिनानिमित्त एका महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचा उद्देश सर्वांगीण कल्याण आणि महिला सक्षमीकरणाला चालना देणे हा होता. हा कार्यक्रम रिझवी कॉलेज ऑफ एज्युकेशनने आयोजित केलेल्या साकिब रिझवी अवेअरनेस मॅरेथॉनचा एक भाग आहे, जी 1 डिसेंबर 2024 रोजी BKC येथे होणार आहे. 'रन फॉर सेफ्टी' आणि 'रन फॉर सस्टेनेबिलिटी' ही यंदाची थीम आहे. रिझवी ट्रस्टचे अध्यक्ष डॉ.अख्तर हसन रिझवी आणि अधिवक्ता रुबिना अख्तर हसन रिझवी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित हा कार्यक्रम रिझवी कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या प्राचार्या श्रीमती नाहिदा मांडवीवाला यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात योग आणि मानसिक आरोग्य सत्राने झाली, ज्यामध्ये डॉ. प्रियंका पांडे आणि डॉ. ज्ञानप्रकाश आर्य यांनी मानसिक आरोग्याच्या महत्त्वावर आणि त्याबद्दल जागरुकता वाढविण्यावर भर दिला. यानंतर, मांडला आर्ट कलरिंगचे आयोजन करण्यात आले, जे तणावमुक्ती आणि मानसिक कायाकल्पासाठी एक सर्जनशील माध्यम होते. मार्शल आर्ट तज्ञ मुस्ताक अहमद सर आणि साक्षी वैश्य मॅडम यांनी महिलांसाठी स्व-संरक्षण प्रशिक्षण सत्र आयोजित केले, ज्यात सुरक्षा तंत्र आणि आत्मविश्वास निर्माण करण्यावर भर दिला. या कार्यक्रमात बी.एड. अवामी ज्युनिअर कॉलेजच्या इयत्ता 11वी आणि 12वीच्या मुला-मुलींनी सक्रिय सहभाग घेतला. हा कार्यक्रम मानसिक आरोग्य जागरुकता, सशक्तीकरण आणि सामुदायिक सहभागाला चालना देण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल होते. यंदाच्या मॅरेथॉनचा चेहरा चित्रपट अभिनेता अरबाज खान असेल.




